**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः06.10.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते वाशिम इथं कृषी क्षेत्रासाठीच्या योजनांचा प्रारंभ, तर मुंबई, ठाण्यातील पायाभूत सुविधांच्या कामांची पायाभरणी आणि लोकार्पण.**
- **मराठी भाषेला देण्यात आलेल्या अभिजात भाषेच्या दर्जानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मराठी भाषा सन्मान सोहोळ्याचं आयोजन.**
- **एक देश एक निवडणूकीचा देशाला मोठा फायदा होईल : माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचं प्रतिपादन.**

**आणि**

- **महिलांच्या 20 षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना पाकिस्तानविरुद्ध.**

**पंतप्रधान वाशिम**

केंद्र सरकारचा प्रत्येक निर्णय आणि धोरण विकसित भारताचं ध्येय पूर्ण करण्यासाठी समर्पित असून शेतकरी हा या दृष्टिकोनाचा मुख्य आधार आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल महाराष्ट्रातल्या वाशिम इथं एका कार्यक्रमात केलं. कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित जवळपास २३ हजार कोटी रुपयांच्या उपक्रमांचा प्रारंभ पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. भटक्या जमाती आणि समुदायांच्या विकासासाठीही सरकार कटिबद्ध असल्याचं ते यावेळी बोलताना म्हणाले. वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथं बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेचं दर्शन घडविणाऱ्या बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटनही काल पंतप्रधान मोदींनी केलं. भटक्या जमातींचा विकास हा महाराष्ट्र शासनाच्या संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचं त्यांनी नमूद केलं. यावेळी मोदींच्या हस्ते पंतप्रधान शेतकरी सन्मान निधीच्या १८ व्या हप्त्याची सुमारे २० हजार कोटी रुपयांची रक्कम देशभरातील जवळपास साडे नऊ कोटी शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली. त्याचवेळी राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेअंतर्गत १९ शे कोटी रुपयांच्या मदतीचंही राज्यातल्या ९० लाख शेतकऱ्यांना त्यांच्या हस्ते वाटप करण्यात आलं. याशिवाय ९ हजार दोनशे कृषी उत्पादक संघटनांसह १ हजार ९२० कोटी रुपये खर्चाच्या साडे सात हजार कृषी पायाभूत निधी प्रकल्पांचं लोकार्पणही पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं. शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्यात उभारण्यात येणाऱ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाच्या पहिल्या पाच सौर उद्यानांचं लोकार्पण मोदी यांच्या हस्ते पोहरादेवी इथं करण्यात आलं.

त्याचबरोबर काल संध्याकाळी मोदी यांच्या हस्ते ठाण्यात ३२ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध पायाभूत सुविधांच्या कामांचं भूमीपूजन आणि लोकार्पण करण्यात आलं. त्यामध्ये बीकेसी ते आरे दरम्यानच्या मेट्रो ३ चं उद्घाटन, ठाणे वर्तुळाकार मेट्रो आणि मुंबईतील घाटकोपर जवळच्या छेडा नगरपासून ठाण्यातल्या

आनंदनगरपर्यंतच्या पूर्वमुक्त महामार्गाच्या विस्तारीत भागाच्या पायाभरणीचा समावेश आहे. याशिवाय 'नैना' अर्थात नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्रातल्या विकास कामांचा पहिला टप्पा, ठाणे महापालिकेच्या नव्या इमारतीचं भूमीपूजनही पंतप्रधानांच्या हस्ते झालं.
महाविकास आघाडी पुन्हा सत्तेत आल्यास महायुती सरकारच्या योजना बंद करेल. त्यांच्या कार्यकाळात सरकारी पैसा महिलांच्या नव्हे तर दलालांच्या हाती जाईल, असा दावा त्यांनी केला. मुंबई महानगर क्षेत्रातल्या विकासकामांमध्ये महाविकास आघाडीनं अडथळे आणले. यामुळं मुंबई मेट्रो ३ प्रकल्पाची किंमत १४ हजार कोटी रुपयांनी वाढली. हा जनतेच्या पैशाचा अपव्यय असल्याचं मोदी म्हणाले.
मुंबईत नव्या मेट्रोच्या उद्घाटनानंतर मोदी यांनी त्यामधून प्रवासदेखील केला. या प्रवासादरम्यान त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी, विद्यार्थी आणि कामगारांशी संवाद साधला. सर्वसामान्य नागरिकांसाठी उद्या पहाटेपासून ही मेट्रो सुरू होणार आहे.

**मराठी सन्मान**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आल्यानिमित्त काल मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मराठी भाषा सन्मान सोहोळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. अभिजात भाषेचा दर्जा मिळणं हा मराठीसाठी सोनेरी क्षण असल्याचं या सोहोळ्याला संबोधित करताना ते म्हणाले. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानं मराठीच्या विकासाच्या दृष्टीनं कोणते लाभ होतील, भाषा अभ्यासकांना कसा फायदा होईल हे देखील हे मोदी यांनी स्पष्ट केलं. महाराष्ट्रातील महान संत परंपरा, मराठी भाषेचा गौरव वाढविण्यात संत साहित्यानं दिलेलं योगदान, संपूर्ण देशाचं प्रेरणास्थान असलेले छत्रपती शिवाजी महाराज, मराठीला लाभलेली साहित्यिक, पत्रकारांची, थोर परंपरा तसंच स्वातंत्र्यलढ्यात लोकांना संघटित करुन, त्यांच्यात जागृती घडवून आणण्यासाठी महाराष्ट्रातल्या नेत्यांनी, समाज सुधारकांनी केलेलं कार्य, रंगभूमी, चित्रपट, संगीत या क्षेत्रात आपल्या प्रतिभेनं मोठा नावलौकिक मिळालेले ख्यातनाम मराठी कलाकार अशा साऱ्यांचा नावानिनिशी उल्लेख करून त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. मराठी भाषकांनी आपल्या भाषेला जागतिक पातळीवर पोहोचवण्याचे प्रयत्न करावेत असं आवाहन करत त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार तसंच विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**एक देश एक निवडणूक**

विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना एकाचवेळी निवडणुका घेण्याचा भारताला खूप मोठा फायदा होईल असं प्रतिपादन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्ली एक देश एक निवडणूक या विषयावर ३० व्या लाल बहादूर शास्त्री स्मृती व्याख्यानात बोलत होते. एक देश एक निवडणुकीमुळे उत्तम प्रशासन, धोरणात्मक स्थिरता, सामाजिक एकोपा, आर्थिक वाढ आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढेल असंही कोविंद यांनी यावेळी सांगितलं. एक देश एक निवडणूकीमुळे अधिक समावेशक आणि समृद्ध भविष्यासाठी मूलभूत सुधारणा होण्यास मदत होणार आहे. कोविंद यांच्या नेतृत्वाखालील समितीने या संदर्भातील अहवाल नुकताच राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्याकडे सादर केला होता.

**मुइज्जू**

मालदीवचे राष्ट्रपती डॉ मोहम्मद मुइज्जू आज पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय, प्रादेशिक आणि परस्पर हिताच्या आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरदेखील ते चर्चा करणार आहेत. मुईज्जू या दौऱ्यात बेंगळुरू आणि मुंबई इथं व्यापाराशी निगडीत कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**राहुल गांधी**

काँग्रेस सत्तेवर आल्यास आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा काढून टाकण्यात येईल तसंच देशात जातनिहाय सर्वेक्षण करण्यात येईल असं आश्वासन लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि खासदार राहुल गांधी यांनी काल दिलं. कोल्हापुरात आयोजित संविधान सन्मान संमेलनाला संबोधित करताना राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेसोबतच सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण आणि देशातल्या महत्त्वाच्या संस्थांमधील विविध समाजांच्या सहभागाचं मूल्यमापन होणं गरजेचं असल्याचं सांगितलं. राहुल गांधी यांच्या हस्ते कोल्हापूरच्या कसबा बावडा इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. शिवाजी महाराजांनी जे सांगितलं, त्याचं; संविधान हे २१ व्या शतकातलं रुप असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

**हरियाणा**

हरियाणा विधानसभा निवडणुकीत काल सुमारे ६७ टक्के मतदान झाले. 90 सदस्य असलेल्या विधानसभेसाठी एकाच टप्प्यात झालेलं मतदान मोठ्या प्रमाणात शांततेत पार पडले. या निवडणुकीत ८५ वर्षांवरील मतदार आणि दिव्यांग व्यक्तींसाठी घरपोच मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. जम्मू-काश्मीरसह हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी मंगळवारी होणार आहे.

**एअर शो**

भारतीय हवाई दलाकडून आज चेन्नईमध्ये भव्य हवाई प्रात्यक्षिके सादर केली जाणार आहेत. हवाई दलाच्या 92 व्या वार्षिक वायुसेना दिनाच्या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर याचं आयोजन करण्यात आलं आहे. तेजस, मिराज, सुखोई ३० एमकेआय, जग्वार आणि पोसेडॉन विमाने आणि हेलिकॉप्टर यासह लढाऊ विमाने यामध्ये सहभागी होणार आहेत.  सकाळी 11 वाजता ही प्रात्यक्षिके सुरू होणार आहेत. या कार्यक्रमाचे लिम्का रेकॉर्ड बुकमध्ये विक्रम नोंदवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**डीआरडीओ**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात DRDO नं राजस्थानमधल्या पोखरण इथं कमी टप्प्यासाठीच्या अत्याधुनिक हवाई बचाव यंत्रणेच्या तीन चाचण्या यशस्वीरीत्या पार पाडल्या. या प्रणालीनं अतिजलद लक्ष्याचा पाठलाग केला. लक्ष्याचा भेद करून परत येण्याची क्षमता या शस्त्रास्त्र प्रणालीमध्ये असल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली आहे. ही यंत्रणा देशांतर्गत विकसित करण्यात आली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशाबद्दल DRDO, संरक्षण दल आणि यासाठी सहाय्य करणाऱ्या उद्योगांचं अभिनंदन केलं आहे. आधुनिक

तंत्रज्ञानानं सुसज्ज अशा या क्षेपणास्त्रामुळे हवाई धोक्यांविरुद्ध सशस्त्र दलांना बळ मिळालं असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**महिला क्रिकेट**

संयुक्त अरब अमिराती इथं सुरू असलेल्या महिलांच्या 20 षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल इंग्लंडने बांगलादेशवर 21 धावांनी विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. तर आज भारताचा सामना पाकिस्तान संघाविरुद्ध दुबईत सामना होणार आहे. दुपारी साडेतीन वाजता हा सामना सुरू होईल. पुरुषांच्या क्रिकेटमध्ये आज भारत आणि बांग्लादेश यांच्यातील तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या वीस षटकांचा सामना ग्वाल्हेर इथं होणार आहे. संध्याकाळी 7 वाजता हा सामना सुरू होणार आहे. नवोदित वेगवान गोलंदाज मयंक यादव याला या सामन्यात पदार्पणाची संधी मिळण्याची शक्यता आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.